| MHAU060007032009 | नि.दि.दिवाणी क्र.६५/२००९<br>अब्दुल समद वि. अब्दुल वाहेद |
|---|---|

## निशाणी १ खालील आदेश

प्रस्तुतचा खटला १५ वर्षपेक्षा जास्त जुना आहे. दावा प्रतवादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. अभिलेखावरून असे दिसून येते की, वर्षभराहून अधिक कालावधीसाठी प्रकरण प्रतिवादीच्या उलटतपासासाठी आहे. या न्यायालयाने पदभार स्विकारल्यापासून सुमारे ९ वेळा सुनावणीसाठी तारीख ठेवण्यात आली. त्याच्यामध्ये १ वेळेस उलटतपास घेण्यात आलेला आहे.

अशा परिस्थितीमध्ये वादी यांच्याकडून उलटतपासात काही कागदपत्रे दाखल करायची आहेत असे म्हणून दिनांक १८.०७.२०२४ रोजी उलटतपास तहकुब करण्यात आलेला आहे. त्या दरम्यान प्रतिवादी यांच्याकडून निशाणी १६५ येथे अर्ज देण्यात आलेला असून त्या सोबत २ न्यायनिर्णय देण्यात आलेले आहे. त्या न्यायनिर्णयास अनुसरून त्या दिवशी चर्चा व युक्तीवाद करण्यात आला. पुढील तारखेस वादी यांचे विधिज्ञ येवू न शकल्याने कामकाज होवू शकले नाही. मात्र न्यायालयासमोरील मुद्यास अनुसरून न्यायालयाने मा. सर्वोच्च न्यायालय यांनी मोहम्मद अब्दुल वाहिद वि. निलोफर व ईतर यांच्या मधील न्यायनिर्णय प्रतिवादीच्या विधिज्ञांना देण्यात आला. त्यास अनुसरून आज रोजी दाव्याची पुढील सुनावणी होणे अपेक्षीत होते.

सकाळच्या सत्रामध्ये प्रतिवादी पुकारले असता गैरहजर राहिले मात्र

वादी यांच्यामार्फत कोणीही हजर नव्हते. सकाळच्या सत्रामध्ये दुपारी १ वाजेपर्यंत प्रतिवादी यांच्याकडून कोणत्याही स्वरूपाचा अर्ज देण्यात आला नव्हता. मात्र आज रोजी दुपारी १ नंतर प्रतिवादी यांच्याकडून विधिज्ञ बदलायचे आहेत म्हणून एक वकिलपत्र सादर करून वेळ मागण्यात आली. वास्तविकता मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णयाप्रमाणे त्या बाबतचा युक्तीवाद करून प्रकरणात पुढील प्रगती अपेक्षीत होती. मात्र प्रतिवादीचे विधिज्ञ यांना आज कामकाज कोणत्याही परिस्थितीत चालवायचे नव्हते. प्रतिवादी यांच्या अर्जाला आज रोजी वादी यांनी म्हणणे दिले होते. वस्तुतः त्या अर्जावर सुनावणी घ्यायला आज रोजी कोणतीही अडचण नव्हती. मात्र असे असतांना न्यायालय प्रतिवादी यांना संधी देत नाही, अशा प्रकारचा आक्षेप त्यांनी अत्यंत चुकीच्या पध्दतीने घेवून कामकाजावर टिप्पणी केलेली आहे. मुळतः प्रतिवादीचे वकिल जेष्ठ विधिज्ञ आहेत. त्यांना त्यांच्या आक्षेपाबाबत समजावण्यात आले मात्र असे असतांनाही त्यांनी न्यायालयासमोर कामकाज न चालविण्याच्या अनुषंगाने घेतलेला पावित्रा हा जेष्ठ विधिज्ञांना शोभनिय नाही. एका बाजुला प्रतिवादीचे विधिज्ञ वकिल बदलणार आहे असेही सांगत आहे व दुस–या बाजुला ते स्वतः देखील प्रकरणाबाबत बाजु देखील मांडत आहे. या गोष्टीवरून त्यांना नेमके काय करायचे आहे हे स्पष्ट होत नाही.

प्रकरण जुने असल्यामुळे लवकरात लवकर चालवण्याचे पूर्ण प्रयत्न न्यायालय करत आहे. मात्र सदर जेष्ठ विधिज्ञ एक प्रकारे कामकाजाबाबत अनावश्यक टिप्पणी करून पक्षकारांमध्ये चुकीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत असे न्यायालयाला दिसून आले. तरी त्यांना त्यांच्या जेष्ठतेनूसार सम्मान देवून समजावले असता ते ऐकण्याच्या परिस्थिती नव्हते. त्यामुळे न्यायकक्षातील ईतर जेष्ठ विधिज्ञांनी त्यांना समजावले व झाल्या प्रकाराबाबत वादीचे विधिज्ञ यांनी प्रतिवादी यांच्या विधिज्ञांकरीता माफी देखील मागितली.

एकदंरीत परिस्थितीत पक्षकारांना न्याय अधिकारासाठी संधी देवून त्यांची बाजु ऐकून न्याय निवाडा केला जातो. मात्र न्यायालयाने संयम ठेवून पक्षकारांना दिलेल्या संधीचा चुकीचा अर्थ काढून कामकाज चालवण्याच्या जबाबदारी टाळणे विधिज्ञांकडून अपेक्षीत नाही. सबब प्रकरण १५ वर्षे जुने असल्यामुळे दोन्ही बाजुंनी न्यायालयाला सहकार्य करून कामकाज चालवणे अपेक्षीत आहे. सर्वसाधारणपणे पक्षकारांकडून व विधिज्ञांकडून अशी भाषा अपेक्षीत नाही की, पलीकडच्या पक्षकाराने एक महिना वेळ घेतला म्हणून आम्हालाही वेळ मिळणे अपेक्षीत आहे. पक्षकारांच्या व्यक्तिगत मताने न्यायालयाचे कामकाज चालु शकत नाही. त्यांनी न्यायालयाच्या वेळेत कामकाज चालवणे व न्यायालयाच्या वेळेला महत्व देणे गरजेचे आहे. पक्षकारांच्या वैयक्तिक अहंकारापोटी कामकाजत मुदती घेणे किंवा मागणे किंवा कामकाज टाळणे अपेक्षीत नाही. दोन्हीही बाजुंना यापुढे अनावश्यक मुदती दिल्या जाणार नाहीत व कामकाज जलद गतीने चालवण्यात येईल याची नोंद दोन्ही बाजुच्या पक्षकारांनी घ्यावी.

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2024.09.05 18:33:54 +0530

कन्नड (वि. द. पाटील)

दिनांक :०५/०९/२०२४ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कन्नड